| b. Remote e-voting period Ends on | : | Sunday, September 20, 2026 at 5:00 PM (IST) |

During the aforesaid period, Members holding shares of the Company as on **Monday, September 14, 2026 ('Cut-Off date')** may cast their vote by remote e-voting before the AGM. The remote e-voting module shall be disabled by CDSL for voting thereafter. Once the vote on resolutions are cast and submitted by the Member, he / she shall not be allowed to change it subsequently. The voting rights of the Member shall be in proportion to their Share of the paid-up equity share capital of the Company as on the Cut-Off date.

5. The Board has appointed CS Mukesh Siroya (ICSI Membership No. FCS 5682, CoP No. 4157), Proprietor, M/s. M Siroya and Company, Company Secretaries, Mumbai, and failing him, CS Bhavyata Acharya (ICSI Membership No. ACS: 25734; CoP: 21758), Partner, M/s. Siroya and BA Associates, Company Secretaries, as the Scrutinizer to scrutinize the entire e-voting process in a fair and transparent manner.
6. Detailed procedure for remote e-voting before the AGM / e-voting during the AGM and to attend the AGM through VC/OAVM is provided in the Notes to the Notice of the AGM. Members facing any technical issue while logging in, including those who have acquired the shares of the Company after the date of dispatch of the Notice but holds shares as on the Cut-off date, can contact CDSL Helpdesk by sending a request to helpdesk.evoting@cdslindia.com or contact at toll free no. 1800 21 09911.
7. Members may participate in the AGM even after exercising his / her right to vote through remote e-voting, but shall not be allowed to vote again during the AGM.
8. Members may write an e-mail to Mr. Debashis Dey, Company Secretary at company.secretary@cms.com and/or to CDSL at helpdesk.evoting@cdslindia.com or contact at toll free no. 1800 21 09911 in case of questions or grievance related to the facility for e-voting.

**For CMS Info Systems Limited**
Sd/-
**Debashis Dey**
**Company Secretary and Compliance Officer**

Date: August 28, 2026
Place: Mumbai


THE BUSINESS DAILY
FOR DAILY BUSINESS
FINANCIAL EXPRESS
Read to Lead
INDIAN EXPRESS GROUP

# बालकांना अतिरिक्त उष्णतेचा वाढता धोका

**आरोग्य वार्ता**

**नवी दिल्ली :** हवामान बदलामुळे भारतातील तब्बल ६१ टक्के म्हणजेच १४.५ कोटी लहान बालकांना दरवर्षी किमान एक अतिरिक्त महिना धोकादायक उष्णतेच्या त्रासाला (हीट स्ट्रेस) सामोरे जावे लागत आहे. आंतरराष्ट्रीय संशोधकांनी केलेल्या एका अभ्यासातून ही माहिती समोर आली आहे. बेल्जियममधील 'व्रिजे युनिव्हर्सिटी ब्रुसेल्स'च्या संशोधकांच्या नेतृत्वाखाली झालेले हे संशोधन 'सायन्स अॅडव्हान्सेस' या नियतकालिकात प्रसिद्ध झाले आहे.

या अभ्यासानुसार, मानवनिर्मित हवामान बदलामुळे जगभरात ९ वर्षांपर्यंतच्या तब्बल ५६ कोटी (४३ टक्के) बालकांना दरवर्षी किमान एक महिना अतिरिक्त उष्णतेचा सामना करावा लागत आहे. तसेच ५ महिने अतिधोकादायक उष्णतेचा सामना करणाऱ्या बालकांची संख्या ५.९ कोटींवरून थेट ११.८ कोटींवर पोहोचली आहे. विशेषतः दमट उष्णता अधिक घातक ठरत असून, यामुळे शरीराला घाम येऊन थंड होण्याची नैसर्गिक प्रक्रिया रोखली जाते आणि डिहायड्रेशन, हीटस्ट्रोक व अवयव निकामी होण्याचा धोका असतो. दक्षिण व आग्नेय आशिया, पश्चिम आफ्रिकेत अशा बालकांची संख्या सर्वाधिक आहे. भारतातील तापमान १.५ अंश सेल्सिअसने वाढल्यास तब्बल १६.६ कोटी (७४ टक्के) बालके आणि २ अंशाने वाढल्यास १६.९ कोटी (९६ टक्के) बालके या समस्येने प्रभावित होण्याचा अंदाज आहे.







# गणेशमूर्तींच्या वाटेवर खड्ड्यांचे विघ्न

## ऑगस्ट महिन्यात मुंबई महापालिकेकडे चार हजार तक्रारी

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**मुंबई :** गणेशोत्सव तोंडावर आला असताना मुंबईतील रस्त्यांची दुरवस्था आणि त्यावरून सुरू झालेली राजकीय चढाओढ ऐरणीवर आली आहे. सद्यस्थितीत शहरात खड्ड्यांच्या तक्रारींचा अक्षरशः 'पाऊस' पडत असून चालू महिन्यात म्हणजेच ऑगस्टमध्ये तब्बल चार हजार तक्रारी पालिका प्रशासनाला प्राप्त झाल्या आहेत. त्यामुळे खड्डेमुक्त रस्त्यांच्या पालिकेच्या दाव्यांवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.

भुलेश्वर येथे एका मंडळाची २२ फूट उंच गणेशमूर्ती कोसळून मंडळाचे दोन कार्यकर्ते मृत्युमुखी पडले. तेव्हापासून रस्त्यांवरच्या खड्ड्यांचा प्रश्न नव्याने ऐरणीवर आला आहे. पालिकेने गणेशमूर्ती आगमनाच्या मार्गावरील खड्डे बुजविण्याची कार्यवाही हाती घेतली असली तरीही उशिरा सुचलेल्या शहाणपणावर भाविकांकडून टीकेची झोड उठत आहे. गणेशमूर्तींच्या आगमन मार्गांवर केवळ खड्डेच अडथळा ठरत नसून रस्त्यांवरील लोंबकळणाऱ्या केबल, अनधिकृत पार्किंग व गतिरोधक यांचाही त्रास होत आहे. मोठ्या आकाराच्या मूर्ती घेऊन जाणाऱ्या मंडळांना याचा अधिक त्रास होत असल्याने मंडळांच्या पदाधिकाऱ्यांकडून चिंता व्यक्त केली जात आहे.

दरम्यान, प्रशासनाच्या काँक्रिटीकरणाच्या दाव्यांवरही जोरदार टीका होत आहे. महापालिकेला आतापर्यंत खड्ड्यांबाबतच्या सुमारे ९ हजार तक्रारी प्राप्त झाल्या असून त्यात ऑगस्टमधील ४ हजार २१७ तक्रारींचा समावेश आहे. त्यामुळे प्रशासनाच्या कारभाराबाबत गणेशभक्तांमध्ये नाराजी असून आगमन मार्गावरील खड्डे तातडीने बुजवण्याची मागणी होत आहे. आतापर्यंत प्राप्त तक्रारींपैकी ८ हजार ७७७ तक्रारींचे पालिका प्रशासनाने निवारण केले आहे. तसेच ५९९ तक्रारी अन्य प्राधिकरणांशी संबंधित असल्याने संबंधित विभागाकडे तक्रारी पाठविण्यात आल्या आहेत.

दरम्यान, हजारो खड्डे बुजविण्याचा दावा केला जात असतानाही रस्त्यांवर खड्डे, उंचवटे आणि असमतोल पृष्ठभागाची समस्या कायम आहे. त्यामुळे मोठ्या गणेशमूर्तींच्या आगमनाचे मंडळांसमोर मोठे आव्हान आहे.



### तक्रारींची नोंद, निवारणाची कार्यवाही

- एकूण तक्रारी : ९ हजार ३६
- ऑगस्टमधील तक्रारी : ४ हजार २१७
- मार्गी लावलेल्या तक्रारी : ८ हजार ७७७
- प्रलंबित तक्रारी : २५९
- इतर प्राधिकरणांशी संबंधित : ५९९

# राजकीय हेतूने नाव गोवल्याचा आदित्य ठाकरे यांचा दावा

## दिशा सालियन मृत्यूप्रकरणी न्यायालयात युक्तिवाद

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**मुंबई :** अभिनेता सुशांतसिंह राजपूत याची माजी व्यवस्थापक दिशा सालियन हिच्या मृत्यू प्रकरणी आपल्याविरोधात कोणतीही तक्रार नसतानाही निव्वळ राजकीय हेतूने आपले नाव या प्रकरणात गोवले जात आहे, असा युक्तिवाद शिवसेना (ठाकरे गट) आमदार आदित्य ठाकरे यांच्यावतीने शुक्रवारी उच्च न्यायालयात करण्यात आला. दरम्यान, याप्रकरणी सर्व पक्षकारांचा युक्तिवाद पूर्ण झाल्यानंतर न्यायालयाने दिशाच्या वडिलांनी केलेल्या याचिकेवरील निकाल राखून ठेवला.

दिशा हिने आत्महत्या केली नव्हती, तर लैंगिक अत्याचारानंतर तिची हत्या करण्यात आली होती, असा दावा करून या प्रकरणाची सीबीआय चौकशी करावी या मागणीसाठी दिशाचे वडील सतीश सालियन यांनी उच्च न्यायालयात याचिका केली आहे. या याचिकेवर सलग तीन दिवस सुनावणी घेतल्यानंतर न्यायमूर्ती सारंग कोतवाल आणि न्यायमूर्ती रणजितसिंह भोसले यांच्या खंडपीठाने याचिकेवरील निर्णय राखून ठेवला. तत्पूर्वी, याचिकेत हस्तक्षेप अर्ज दाखल करणाऱ्या आदित्य ठाकरे यांच्या वतीने वरिष्ठ वकील सुदीप पासबोला यांनी युक्तिवाद केला.

याप्रकणी आपल्याविरोधात कोणतीही तक्रार किंवा गुन्हा दाखल केलेला नाही. तसेच, कोणाच्या तरी सांगण्यावरून कारवाई करणे योग्य ठरणार नाही, असा युक्तिवाद ठाकरे यांच्यावतीने करण्यात आला.



### मृतदेहाच्या स्थितीबाबत प्रश्नचिन्ह

इतक्या उंचावरून पडूनही फक्त तोंडातूनच रक्त कसे आले ? तोंडावर आणि शरीरावर इतर कुठल्याही मोठ्या जखमा का नाहीत ? अशी विचारणा न्यायालयाने केली. त्याला उत्तर देताना, दिशा उंचावरून तोंडावर पडली होती, त्यामुळे, तिच्या डोक्याला आणि जबड्यालाही जबर मार लागला होता. तसेच, तिच्या शरीरावर अन्यही जखमाही होत्या, असे सरकारी वकील शिशिर हिरे यांनी न्यायालयाला सांगितले.

# 'म्हाडा'कडून भाडेतत्त्वावरील घरांचे संकेतस्थळ दिवाळीत सुरू

## 'टीसीएस'ला कार्यादेश; संपूर्ण प्रक्रिया ऑनलाइन करण्याची तयारी

**मंगल हनवते, लोकसत्ता**

**मुंबई :** मुंबईसह राज्यात भाडेतत्त्वावरील अधिकाधिक घरे नागरिकांना सुलभ प्रक्रियेद्वारे उपलब्ध व्हावीत यासाठी म्हाडाने पुढाकार घेतला आहे. भाडेतत्त्वावरील घरांच्या निर्मितीसह ती घरे भाड्याने देण्यासंबंधीचे सविस्तर धोरण म्हाडाने तयार केले असून हे धोरण मंजुरीच्या प्रतीक्षेत आहे. त्यातच म्हाडाने भाडेतत्त्वावरील घरांच्या वितरणासाठी संकेतस्थळ तयार करण्याची निविदा अंतिम करून टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस (टीसीएस)ला कार्यादेश दिले आहेत. त्यानुसार आता दोन महिन्यांत पोर्टल तयार करून दिवाळीत ते कार्यान्वित करण्याचा निर्णय म्हाडाने घेतला आहे.

या निर्णयामुळे दिवाळीपासून मुंबईसह राज्यभरात भाड्याने घर देणे आणि घेणे सोपे होणार आहे. भाडेकरारापासून ते घरभाडे अदा करण्याची संपूर्ण प्रक्रिया या ऑनलाइन होणार असून नागरिकांची दलालांच्या जाचातून सुटका होणार आहे.

नीती आयोगाच्या अहवालानुसार मुंबई महानगर प्रदेशात आजघडीला २५ टक्के अर्थात १४ लाख १२ हजार कुटुंबे भाड्याच्या घरात राहत असून भाडेतत्त्वावरील घरांची मागणी अजून वाढत आहे. तर दुसरीकडे भाडेकरू, घरमालक यांची विविध कारणांमुळे फसवणूक होते.

या सर्व पार्श्वभूमीवर राज्याच्या नवीन गृहनिर्माण धोरणात भाडेतत्त्वावरील गृहनिर्मितीला प्राधान्य दिले जात असून भाडेतत्त्वावरील घरांचे वितरण आणि इतर प्रक्रिया सरकारी नियंत्रणाखाली व्हावी यासाठी ठोस पाऊल उचलण्यात आले आहे. त्यानुसार भाड्याच्या घराची सर्व प्रक्रिया संगणकीय पद्धतीने, मानवी हस्तक्षेप टाळून एका क्लिकवर करून देण्यासाठी संकेतस्थळ तयार करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला. याची सर्व जबाबदारी म्हाडाकडे सोपवली. त्यानुसार म्हाडाने नुकतीच निविदा अंतिम करून पात्र कंत्राटदाराला कार्यादेश दिल्याची माहिती म्हाडा उपाध्यक्ष संजीव यजस्वाल यांनी बुधवारी 'लोकसत्ता' आयोजित 'आरटीसी अर्बन रिडेव्हलपमेंट परिषदे'त दिली होती.

### स्वतंत्र धोरण लागू करणारे एकमेव राज्य

अशाप्रकारे पोर्टलद्वारे भाडेतत्त्वावरील घरे उपलब्ध करून देणारे तसेच भाडेतत्त्वावरील घरांसाठी स्वतंत्र धोरण लागू करणारे महाराष्ट्र देशातील पहिले राज्य ठरणार असल्याचाही दावा करण्यात आला आहे. दरम्यान, पोर्टल दोन महिन्यांत तयार होणार असून यादरम्यान भाडेतत्त्वावरील घरांच्या धोरणाला सरकारकडून मंजुरी मिळेल, अशी आशा आहे. त्यामुळे दिवाळीत पोर्टल कार्यान्वित होऊन धोरण लागू होईल, असेही म्हाडाकडून सांगण्यात आले.



ठाण्यातील टेंभीनाका येथील आनंद आश्रमाबाहेर शुक्रवारी रक्षाबंधनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना राज्यातील विविध भागातून आलेल्या महिलांनी राख्या बांधल्या. छाया : दीपक जोशी

# चार उपाहारगृहांचे परवाने निलंबित

**मुंबई :** मुंबई विद्यापीठाच्या कालिना विद्यानगरीतील 'गरवारे इन्स्टिट्यूट ऑफ करिअर'मधील अक्षय कॅटरर्स, वांद्रे येथील 'जिओ वर्ल्ड ड्राइव्ह'मधील क्राफ्टपॅक हॉस्पिटॅलिटी, दादर पश्चिम येथील मॅरियन हॉटेल अँड रेस्टॉरंट आणि चेंबूर येथील राधिका रेसिडेन्सीमधील भगवती स्टोअर्स यांनी स्वच्छतेचे नियम उल्लंघन केल्याप्रकरणी अन्न व औषध प्रशासनाने त्यांचे अन्न व्यवसाय परवाने तत्काळ प्रभावाने निलंबित केले आहेत.

# 'राजावाडी'तील अर्भक मृत्यू प्रकरणात कोणतीही दिरंगाई नाही!

**मुंबई :** राजावाडी रुग्णालयाच्या प्रसूती विभागात तीन बाळांचा मृत्यू गंभीर वैद्यकीय परिस्थितीमुळे झाल्याचे रुग्णालय प्रशासनाने सादर केलेल्या अहवालात नमुद करण्यात आले आहे. या घटनांच्या पार्श्वभूमीवर मुंबई महापालिकेच्या आरोग्य समितीचे अध्यक्ष हरीष भांदिर्गे यांनी शुक्रवारी राजावाडी रुग्णालयाला भेट देऊन संबंधित प्रकरणांचा सविस्तर आढावा घेतला. यावेळी त्यांनी रुग्णालयाच्या अधीक्षकांसह संबंधित डॉक्टर व वैद्यकीय अधिकाऱ्यांशी चर्चा करून उपचारांची संपूर्ण माहिती घेतली.

या तीनही प्रकरणांमधील रुग्णांची रुग्णालयात दाखल होतानाची वैद्यकीय स्थिती, झालेल्या तपासण्या, उपचारपद्धती आणि आपत्कालीन परिस्थितीत केलेली वैद्यकीय कार्यवाही याबाबत भांदिर्गे यांनी डॉक्टरांकडून माहिती घेतली. यावरून तिन्ही प्रकरणात तपासणी वा उपचारामध्ये दिरंगाई झाल्याचे दिसून येत नसल्याचे रुग्णालयाच्या अहवालात नमूद करण्यात आले.

याबाबत माहिती घेतल्यानंतर हरीष भांदिर्गे यांनी रुग्णांच्या उपचारात कोणतीही दिरंगाई होऊ नये, यासाठी सूचना केल्या.

**शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर**

Estd: 1962
'A++' Accredited by NAAC (2021) with CGPA 3.52

**प्रवेश सूचना**
**पीएच.डी. प्रवेश २०२६-२७**

शिवाजी विद्यापीठामार्फत पीएच.डी. प्रवेश प्रक्रिया २०२६-२७ अंतर्गत पीएच.डी. अभ्यासक्रमासाठी पात्र उमेदवारांकडून ऑनलाइन अर्ज मागविण्यात येत आहेत. अधिक माहितीसाठी विद्यापीठ अधिकृत संकेतस्थळ https://www.unishivaji.ac.in "Ph.D. Admission 2026-27" लिंकवर भेट द्यावी. सर्व तपशीलवार माहिती आणि Online अर्ज खालील लिंकवर उपलब्ध आहेत.
https://www.unishivaji.ac.in/admission/PhD-Admission-2026-2027
https://sukapps.unishivaji.ac.in/phd-entrance/#/login

**महत्त्वाचे दिनांक :**

- **ऑनलाइन अर्ज प्रक्रिया सुरू : विद्यापीठाच्या संकेतस्थळावर दि. २९/०८/२०२६ रोजी दुपारी १२:०० वाजल्यापासून ते दि. १९/०९/२०२६ रोजी मध्यरात्री १२:०० वाजेपर्यंत अर्ज उपलब्ध करून देण्यात येत आहेत.**
- **प्रवेश परीक्षेचे तपशीलवार वेळापत्रक आणि हॉल तिकीट विद्यार्थ्यांच्या वैयक्तिक लॉगिन मध्ये उपलब्ध करून दिले जाईल.**
- **पीएच.डी. प्रवेश प्रक्रियेची सविस्तर जाहिरात विद्यापीठाच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली आहे. लिंक https://www.unishivaji.ac.in/admission/PhD-Admission-2026-2027**

**दि. २९/०८/२०२६** — **डॉ. व्ही. एन. शिंदे**
**स्थळ: कोल्हापूर** — **कुलसचिव**

# पंधरा दिवसांत कोथिंबिरीचे दर निम्म्यावर

## जुडी २ ते ५ रुपयांवर; शेतकऱ्यांसह व्यापारी अडचणीत

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**नवी मुंबई :** मागणीच्या तुलनेत वाढलेला पुरवठा यामुळे मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीच्या (एपीएमसी) भाजीपाला बाजारात कोथिंबिरीचे दर कोसळले. गेल्या पंधरा दिवसांत कोथिंबिरीच्या दरांत ६० टक्क्यांहून अधिक घसरण झाली असून सध्या एक जुडी अवघ्या २ ते ५ रुपयांना विकली जात आहे. त्यामुळे उत्पादन आणि वाहतूक खर्चही निघत नसल्याने शेतकऱ्यांसह व्यापाऱ्यांनाही आर्थिक फटका बसत आहे.

एपीएमसीच्या आकडेवारीनुसार, ११ ऑगस्ट रोजी नाशिकहून आलेल्या कोथिंबिरीचा १०० जुड्यांचा सरासरी दर १,१०० रुपये होता. तोच दर शुक्रवार, २८ ऑगस्टला ४५० रुपयांवर आला. पुण्याच्या कोथिंबिरीच्या दरातही अशीच घसरण झाली असून ११ ऑगस्टला असलेला ९००चा दर, २८ ऑगस्टला ३०० रुपयांवर आला. गुरुवारी पुणे आणि लातूर परिसरातूनच सुमारे १२१ टन आवक झाली. मात्र मागणीअभावी दरावर परिणाम झाला आहे.

> सध्या बाजारात मोठ्या प्रमाणात कोथिंबीर येत आहे. पावसाळ्यात कोथिंबीर लवकर खराब होत असल्याने मिळेल त्या दरात विकावी लागत आहे. यामुळे व्यापाऱ्यांचे, शेतकऱ्यांचे नुकसान होत आहे. **– प्रदीप साहू,** भाजीपाला व्यापारी, एपीएमसी

# पश्चिम, मध्य रेल्वेवर आज, उद्या ब्लॉक

मुंबई : मध्य रेल्वेच्या मुंबई विभागात रविवारी तर, पश्चिम रेल्वेवर शनिवारी रात्रकालीन ब्लॉक घेण्यात येणार आहे.

**मध्य रेल्वे – मुख्य मार्ग**
**कुठे :** विद्याविहार ते ठाणे
**कधी :** सकाळी ८ ते दुपारी १.३०
**परिणाम :** पाचव्या आणि सहाव्या मार्गावरील रेल्वेगाड्या जलद मार्गावर वळवण्यात येईल.

**ट्रान्सहार्बर मार्ग**
**कुठे :** ठाणे ते वाशी/नेरूळ
**कधी :** स. ११.१० ते दु. ४.१०
**परिणाम :** ठाणे स्थानकातून सकाळी १०.३५ ते दुपारी ४.०७ पर्यंत वाशी/नेरुळ/पनवेलकडे जाणाऱ्या आणि पनवेल/नेरुळ/वाशी येथून सकाळी १०.२५ ते दुपारी ४.०९ पर्यंत ठाण्याकडे जाणाऱ्या रेल्वे सेवा रद्द राहतील.

**पश्चिम रेल्वे**
**कुठे :** वसई रोड ते भाईंदर
**कधी :** शनिवारी रात्री ११.३० ते मध्यरात्री ३ अप जलद मार्गावर आणि मध्यरात्री १.१५ ते पहाटे ४.४५ वाजेपर्यंत डाऊन जलद मार्गावर
**परिणाम :** विरार ते भाईंदर/बोरिवली स्थानकांदरम्यान सर्व जलद लोकल धिम्या मार्गावर चालवल्या जातील. या वेळेत काही लोकल सेवा रद्द होतील.

**कॅरोल इन्फो सर्विसेस लिमिटेड**

**सीआयएन:** U74999MH1979PLC021942
**नोंदणीकृत कार्यालय:** वोकहार्ट टॉवर्स, बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रे (पूर्व), मुंबई – ४०० ०५१
**टेलिफोन:** +९१ २२ २६५३ ४४४४ • **ई-मेल आयडी:** investorrelations@carolinfoservices.com;
**वेबसाइट:** www.carolinfoservices.com

**व्हीसी/ओएव्हीएम द्वारे आयोजित करण्यात येणाऱ्या कंपनीच्या ४६ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेबाबत माहिती**

आपणास सुचित करण्यात येते की, कंपनी कायदा, २०१३ मधील लागू असलेल्या तरतुदी आणि त्याअंतर्गत तयार करण्यात आलेल्या नियमांना अनुसरून, ५ मे २०२०, १३ जानेवारी २०२१, ८ डिसेंबर २०२१, १४ डिसेंबर २०२१, ५ मे २०२२, २५ सप्टेंबर २०२३, १९ सप्टेंबर २०२४ आणि २२ सप्टेंबर २०२५ ची सर्वसाधारण परिपत्रके आणि ८ एप्रिल २०२० व १३ एप्रिल २०२० यासंदर्भात कंपनी व्यवहार मंत्रालयाने जारी केलेली इतर सर्व परिपत्रके, ('एमसीए परिपत्रके') या सर्वांना अनुसरून कॅरोल इन्फो सर्विसेस लिमिटेड (द कंपनी) ची ४६ वी वार्षिक सर्वसाधारण सभा (एजीएम/सभा) **मंगळवार, २९ सप्टेंबर २०२६** रोजी व्हिडीओ कॉन्फरन्सिंग ('व्हीसी') सुविधा/अन्य दृकश्राव्य माध्यमातून ('ओएव्हीएम') सकाळी ११.३० वा. आयोजित करण्यात आलेली आहे.

सभासदांना एजीएमला उपस्थित राहता येण्यासाठी आणि एजीएमच्या नोटीसमध्ये नमूद केलेल्या सर्व ठरावांवर त्यांचे मतदान इलेक्ट्रॉनिक पध्दतीने करता येण्यासाठी कंपनीने व्हीसी/ओएव्हीएम आणि ई-मतदानाच्या सुविधेसाठी नॅशनल सिक्युरिटीज डिपॉझिटरी लिमिटेड ('एनएसडीएल') चे सहकार्य घेतलेले आहे. एजीएमच्या आयोजनापुर्वी दूरस्थ ई-मतदान प्रणालीच्या माध्यमातून आपले मत नोंदविणारे सभासद व्हीसी/ओएव्हीएमच्या माध्यमातून एजीएममध्ये सहभागी होऊ शकतात, परंतु त्यांना पुन्हा मतदान करण्याचा हक्क मिळणार नाही. एजीएमला उपस्थित राहणारे आणि ज्यांनी मतदान केलेले नाही, अशा सभासदांना एजीएम दरम्यान ई-मतदानाची सुविधा उपलब्ध करुन दिली जाणार आहे. ई-मतदान आणि व्हीसीच्या माध्यमातून उपस्थित राहण्याबाबतची सविस्तर प्रक्रिया एजीएमच्या नोटीसमध्ये नमूद केली जाणार आहे.

त्यानुसार, कंपनीच्या ४६ व्या एजीएमला प्रत्यक्ष उपस्थित राहणे आणि त्यात सहभागी होणे याबाबत कोणतीही तरतूद करण्यात आलेली नाही, याची कृपया सभासदांनी नोंद घ्यावी. व्हीसी सुविधा/ओएव्हीएमच्या माध्यमातून सभेला उपस्थित राहणारे सभासद कंपनी कायदा २०१३ च्या कलम १०३ अंतर्गत कोरम मोजण्याच्या हेतुने गणले जातील.

वार्षिक सर्वसाधारण सभेची (एजीएम) सूचना आणि आर्थिक वर्ष २०२५-२६ चा वार्षिक अहवाल केवळ अशाच सदस्यांना इलेक्ट्रॉनिक पद्धतीने पाठवला जाईल ज्यांचे ईमेल पत्ते कंपनीकडे/रजिस्ट्रार आणि ट्रान्सफर एजंट ('रजिस्ट्रार')/डिपॉझिटरी पार्टिसिपंट कडे नोंदणीकृत आहेत. वरील दस्तऐवजांची एक प्रत कंपनीची वेबसाईट www.carolinfoservices.com आणि एनएसडीएल ची वेबसाईट www.evoting.nsdl.com वर देखील उपलब्ध असेल. एमसीए (कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालय) च्या परिपत्रकांचे पालन करून, कोणत्याही सदस्याला एजीएम सुचना आणि वार्षिक अहवालाच्या भौतिक (कागदी) प्रती पाठवल्या जाणार नाहीत. त्यामुळे, ज्या सदस्यांनी अद्याप आपले ईमेल पत्ते नोंदवलेले नाहीत, त्यांना विनंती करण्यात येते की त्यांनी ई-मतदान आणि एजीएम मध्ये सहभागी होण्यासाठी लॉगिन आयडी, पासवर्ड तसेच मतदानाच्या सूचनांसह एजीएम ची सूचना आणि वार्षिक अहवाल प्राप्त करण्यासाठी investorrelations@carolinfoservices.com वर एक अर्ज पाठवून आपला ईमेल पत्ता अद्ययावत करावा. या अर्जासोबत सर्व धारकांची नावे, फोलिओ क्र./डीपीआयडी, क्लायंट आयडी, मोबाईल नंबर, निवासी पत्ता (स्व-साक्षांकित पत्त्याच्या पुराव्यासह) आणि सर्व धारकांच्या पॅन कार्डची स्व-साक्षांकित प्रत यांसारखा तपशील जोडणे आवश्यक आहे.

ही सूचना कंपनीच्या सदस्यांना माहिती आणि त्यांच्या फायद्यासाठी एमसीएच्या संबंधित परिपत्रकांन्वये देण्यात आली आहे.

संचालक मंडळाच्या आदेशानुसार
**कॅरोल इन्फो सर्विसेस लिमिटेड साठी**
**सही/-**
**स्टीफन डिसोझा**
व्यवस्थापकीय संचालक
(डीआयएन: ०००४५८१२)

**तारीख :** २८ ऑगस्ट, २०२६
**ठिकाण :** मुंबई

**मेरिंड लिमिटेड**

**सीआयएन:** U24239MH1958PLC011204
**नोंदणीकृत कार्यालय:** रेडीमनी टेरेस, दूसरा मजला, रुम क्र. ५, १६७ डॉ. अॅनी बेझंट रोड, वरळी, मुंबई – ४०० ०१८.
**टेलिफोन:** +९१-२२-२४९५ २७७१, **ई-मेल आयडी:** investorrelations@merind.co.in

**व्हीसी/ओएव्हीएम द्वारे आयोजित करण्यात येणाऱ्या कंपनीच्या ६६ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेबाबत माहिती**

आपणास सुचित करण्यात येते की, कंपनी कायदा, २०१३ ('कायदा') मधील लागू असलेल्या तरतुदीनुसार आणि त्याअंतर्गत तयार करण्यात आलेल्या लागू नियमांना अनुसरून, ८ एप्रिल २०२०, १३ एप्रिल २०२०, ५ मे २०२०, १३ जानेवारी २०२१, १४ डिसेंबर २०२१, ५ मे २०२२, २८ डिसेंबर २०२२, २५ सप्टेंबर २०२३, १९ सप्टेंबर २०२४ आणि २२ सप्टेंबर २०२५ ची सर्वसाधारण परिपत्रके आणि यासंदर्भात कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालयाने जारी केलेली इतर सर्व परिपत्रके, ('एमसीए परिपत्रके') या सर्वांना अनुसरून मेरिंड लिमिटेड ('कंपनी') ची ६६ वी वार्षिक सर्वसाधारण सभा ('एजीएम'/'सभा') **मंगळवार, २९ सप्टेंबर २०२६** रोजी व्हिडीओ कॉन्फरन्सिंग ('व्हीसी') सुविधा/अन्य दृकश्राव्य माध्यमातून ('ओएव्हीएम') द्वारे दुपारी ३:३० वाजता (भारतीय प्रमाणवेळेनुसार)आयोजित करण्यात आली आहे.

सभासदांना एजीएमला उपस्थित राहता येण्यासाठी आणि एजीएमच्या नोटीसमध्ये नमूद केलेल्या सर्व ठरावांवर त्यांचे मतदान इलेक्ट्रॉनिक पध्दतीने करता येण्यासाठी कंपनीने व्हीसी/ओएव्हीएम आणि ई-मतदानाच्या सुविधेसाठी नॅशनल सिक्युरिटीज डिपॉझिटरी लिमिटेड ('एनएसडीएल') चे सहकार्य घेतलेले आहे. एजीएमच्या आयोजनापुर्वी दूरस्थ ई-मतदान प्रणालीच्या माध्यमातून आपले मत नोंदविणारे सभासद व्हीसी/ओएव्हीएमच्या माध्यमातून एजीएममध्ये सहभागी होऊ शकतात, परंतु त्यांना पुन्हा मतदान करण्याचा हक्क मिळणार नाही. एजीएमला उपस्थित राहणारे आणि ज्यांनी मतदान केलेले नाही, अशा सभासदांना एजीएम दरम्यान ई-मतदानाची सुविधा उपलब्ध करुन दिली जाणार आहे. ई-मतदान आणि व्हीसीच्या माध्यमातून उपस्थित राहण्याबाबतची सविस्तर प्रक्रिया एजीएमच्या नोटीसमध्ये नमूद केली जाणार आहे.

त्यानुसार, कंपनीच्या ६६ व्या एजीएमला प्रत्यक्ष उपस्थित राहणे आणि त्यात सहभागी होणे याबाबत कोणतीही तरतूद करण्यात आलेली नाही, याची कृपया सभासदांनी नोंद घ्यावी. व्हीसी सुविधा/ओएव्हीएमच्या माध्यमातून सभेला उपस्थित राहणारे सभासद कंपनी कायदा २०१३ च्या कलम १०३ अंतर्गत कोरम मोजण्याच्या हेतुने गणले जातील.

वार्षिक सर्वसाधारण सभेची (एजीएम) सूचना आणि आर्थिक वर्ष २०२५-२६ चा वार्षिक अहवाल केवळ अशाच सदस्यांना इलेक्ट्रॉनिक पद्धतीने पाठवला जाईल ज्यांचे ईमेल पत्ते कंपनीकडे/रजिस्ट्रार आणि ट्रान्सफर एजंट ('रजिस्ट्रार')/डिपॉझिटरी पार्टिसिपंट कडे नोंदणीकृत आहेत. वरील दस्तऐवजांची एक प्रत एनएसडीएल ची वेबसाईट www.evoting.nsdl.com वर देखील उपलब्ध असेल. एमसीए (कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालय) च्या परिपत्रकांचे पालन करून, कोणत्याही सदस्याला एजीएम सुचना आणि वार्षिक अहवालाच्या भौतिक (कागदी) प्रती पाठवल्या जाणार नाहीत. त्यामुळे, ज्या सदस्यांनी अद्याप आपले ईमेल पत्ते नोंदवलेले नाहीत, त्यांना विनंती करण्यात येते की त्यांनी ई-मतदान आणि एजीएम मध्ये सहभागी होण्यासाठी लॉगिन आयडी, पासवर्ड तसेच मतदानाच्या सूचनांसह एजीएम ची सूचना आणि वार्षिक अहवाल प्राप्त करण्यासाठी investorrelations@merind.co.in वर एक अर्ज पाठवून आपला ईमेल पत्ता अद्ययावत करावा. या अर्जासोबत सर्व धारकांची नावे, फोलिओ क्र./डीपीआयडी, क्लायंट आयडी, मोबाईल नंबर, निवासी पत्ता (स्व-साक्षांकित पत्त्याच्या पुराव्यासह) आणि सर्व धारकांच्या पॅन कार्डची स्व-साक्षांकित प्रत यांसारखा तपशील जोडणे आवश्यक आहे.

ही सूचना कंपनीच्या सदस्यांना माहिती आणि त्यांच्या फायद्यासाठी एमसीएच्या संबंधित परिपत्रकांन्वये देण्यात आली आहे.

संचालक मंडळाच्या आदेशानुसार
**मेरिंड लिमिटेड साठी**
सही/-
**डॉ. हुझैफा खोराकीवाला**
**चेअरमन**
डीआयएन: ०२१९१८७०

**तारीख :** २८ ऑगस्ट, २०२६
**ठिकाण :** मुंबई

CMS | UNIFIED PLATFORM. LIMITLESS POSSIBILITIES.

**सीएमएस इन्फो सिस्टिम्स लिमिटेड**

**नोंदणीकृत कार्यालय:** टी-१५१, ५वा मजला, टॉवर क्र. १०, बेलापूर रेल्वे स्टेशन कॉम्प्लेक्स, सेक्टर-११, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई – ४०० ६१४
**सीआयएन:** एल४५२००एमएच२००८पीएलसी१८०४७९,
**संकेतस्थळ:** www.cms.com, **ईमेल:** company.secretary@cms.com,
**दूरध्वनी:** +९१-२२-४८८९ ७४००

**१९ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना**

१. याद्वारे सूचना येथे देण्यात येत आहे की, कंपनीची १९ वी वार्षिक सर्वसाधारण सभा **सोमवार, २१ सप्टेंबर २०२६ रोजी दुपारी ३:३० वाजता (भारतीय प्रमाण वेळ)** व्हिडिओ कॉन्फरन्सिंग ('व्हीसी')/इतर ऑडिओ व्हिज्युअल माध्यमांद्वारे ('ओएव्हीएम') आयोजित करण्यात येईल.

२. कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालय ('एमसीए') आणि भारतीय सिक्युरिटीज अँड एक्सचेंज बोर्ड ('सेबी') यांनी जारी केलेल्या लागू परिपत्रकांसह वाचित कंपनी कायदा, २०१३ च्या सर्व लागू तरतुदी आणि त्याअंतर्गत बनवलेल्या नियमांचे पालन करून, २०२५-२६ या आर्थिक वर्षासाठी कंपनीच्या वार्षिक अहवालासह वार्षिक सर्वसाधारण सभा बोलावण्याची सूचना **गुरुवार, २७ ऑगस्ट २०२६** रोजी कंपनीच्या सदस्यांना इलेक्ट्रॉनिक पद्धतीने (ई-मेलद्वारे) पाठवण्यात आली आहे. त्याची प्रत कंपनीच्या संकेतस्थळावर www.cms.com वर, बीएसई लिमिटेड आणि नॅशनल स्टॉक एक्सचेंज ऑफ इंडिया लिमिटेडच्या संकेतस्थळावर www.bseindia.com आणि www.nseindia.com वर आणि सेंट्रल डिपॉझिटरी सर्व्हिसेस (इंडिया) लिमिटेड ('सीडीएसएल') च्या ई-मतदान संकेतस्थळावर https://www.evotingindia.com देखील उपलब्ध आहे. तसेच, ज्या सदस्यांनी कंपनीकडे त्यांचे ईमेल पत्ते नोंदवलेले नाहीत, त्यांना संपूर्ण वार्षिक अहवाल उपलब्ध करून देणारी वेब-लिंक आणि त्यावरील अचूक मार्ग असलेली माहिती देणारे पत्र प्रत्यक्ष स्वरूपात पाठवण्यात आले आहे.

३. कंपनीने व्हीसी/ओएव्हीएमद्वारे वार्षिक सर्वसाधारण सभेत सहभागी होण्यासाठी दूरस्थ मतदानाची सुविधा प्रदान करण्यासाठी आणि वार्षिक सर्वसाधारण सभे दरम्यान दूरस्थ मतदानासाठी सीडीएसएलच्या सेवा नियुक्त केल्या आहेत.

४. दूरस्थ मतदानाचा तपशील :

| | |
|---|---|
| अ. दूरस्थ मतदान कालावधी सुरू होईल | : शुक्रवार, १८ सप्टेंबर २०२६ सकाळी ०९:०० वा. (भारतीय प्रमाण वेळ) |
| ब. दूरस्थ मतदान कालावधी संपेल | : रविवार, २० सप्टेंबर २०२६ संध्याकाळी ०५:०० वा. (भारतीय प्रमाण वेळ) |

वरील कालावधीत, **सोमवार, १४ सप्टेंबर २०२६ ('कट-ऑफ दिनांक')** रोजी कंपनीचे शेअर्स धारण करणारे सदस्य वार्षिक सर्वसाधारण सभेपूर्वी दूरस्थ मतदानाद्वारे त्यांचे मतदान करू शकतील. त्यानंतर मतदानासाठी सीडीएसएलद्वारे दूरस्थ मतदान मॉड्यूल अक्षम केले जाईल. एकदा सदस्याने ठरावावर मतदान केले की, त्याला/तिला नंतर ते बदलण्याची परवानगी दिली जाणार नाही. सदस्यांच्या मतदानाचे अधिकार कंपनीच्या पेड-अप इक्विटी शेअर भांडवलाच्या त्यांच्या वाट्याच्या प्रमाणात असतील.

५. मंडळाने संपूर्ण ई-मतदान प्रक्रियेची निष्पक्ष आणि पारदर्शक पद्धतीने छाननी करण्यासाठी निरीक्षक म्हणून सीएस मुकेश सिरोया (आयसीएसआय सदस्यता क्रमांक एफसीएस ५६८२, सीओपी क्रमांक ४१५७), मालक, मेसर्स एम सिरोया अँड कंपनी, प्रॅक्टिसिंग कंपनी सेक्रेटरीज, मुंबई आणि त्यांच्या गैरहजेरीत, सीएस भव्यता आचार्य (आयसीएसआय सदस्यता क्रमांक एसीएस: २५७३४; सीओपी: २१७५८), भागीदार, मेसर्स सिरोया अँड बीए असोसिएट्स, कंपनी सेक्रेटरीज यांची नियुक्ती केली आहे.

६. एजीएमपूर्वी दूरस्थ ई-मतदान/वार्षिक सर्वसाधारण सभे दरम्यान ई-मतदान आणि व्हीसी/ओएव्हीएम द्वारे एजीएमला उपस्थित राहण्याची तपशीलवार प्रक्रिया वार्षिक सर्वसाधारण सभेच्या सूचनेत दिली आहे. लॉग इन करताना कोणत्याही तांत्रिक समस्येचा सामना करणाऱ्या सदस्य, ज्यामध्ये नोटीस पाठवल्याच्या तारखेनंतर कंपनीचे शेअर्स घेतले आहेत परंतु कट-ऑफ तारखेला शेअर्स आहेत, ते helpdesk.evoting@cdslindia.com वर विनंती पाठवून सीडीएसएलच्या हेल्पडेस्कशी संपर्क साधू शकतात किंवा टोल फ्री क्रमांक १८०० २१ ०९९११ वर संपर्क करा.

७. वार्षिक सर्वसाधारण सभेपूर्वी दूरस्थ मतदानाद्वारे त्याचा/तीचा मतदानाचा अधिकार वापरल्यानंतरही सदस्य वार्षिक सर्वसाधारण सभेत सहभागी होऊ शकतात, परंतु त्यांना वार्षिक सर्वसाधारण सभेत पुन्हा मतदान करण्याची परवानगी दिली जाणार नाही.

८. ई-मतदान सुविधेशी संबंधित प्रश्न किंवा तक्रारी असल्यास सदस्य कंपनी सचिव श्री देबाशिस दे यांना company.secretary@cms.com वर ईमेल करू शकतात आणि/किंवा सीडीएसएल यांना helpdesk.evoting@cdslindia.com वर ईमेल करू शकतात किंवा टोल फ्री क्रमांक १८०० २१ ०९९११ वर संपर्क साधू शकतात.

**सीएमएस इन्फो सिस्टिम्स लिमिटेड करिता**
**हस्ता/-**
**देबाशिष दे**
**कंपनी सचिव आणि अनुपालन अधिकारी**

दिनांक: २८ ऑगस्ट २०२६
स्थळ: मुंबई